**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दूरध्वनी क्रमांक
०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक :- ३१/०८/२०२३

# नाशिक ग्रामीण पोलिसांचे अवैध व्यवसाय विरोधी अभियान
# महिला पथकांनी उध्वस्त केले ३२ दारूअड्डे, ३३ आरोपींविरुद्ध कारवाई

---

जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या हातभट्टी व्यवसायांचे उच्चाटन करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी महिला पोलीसांची ०४ पथके गठित केली होती. प्रत्येक पथकात आठ महिलांचा समावेश करण्यात आला होता.

जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून दिनांक ०९ ऑगस्ट पासून ग्रामीण पोलीसांच्या या महिला अंमलदार हातभट्टी व्यवसायांच्या निर्मूलनासाठी पुढे सरसावल्या होत्या. गेल्या तीन आठवड्यात सदर महिला पोलीसांनी जिल्हयातील द-या-डोंगरातील छुपे हातभट्टी अड्डे शोधून एकूण ३२ अड्डे उध्वस्त केले आहेत.

ग्रामीण पोलीसांच्या महिलांनी केलेल्या या कार्यवाहीत एकूण ३३ आरोपीतांविरुद्ध मुंबई दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून यात आजवर एकूण ११,९४,१७०/- रुपयांची गावठी हातभट्टीची दारू, रसायन व साहित्य साधने हस्तगत करण्यात आली आहे.

नाशिक ग्रामीण पोलिसांच्या महिला अंमलदारांच्या सदर कारवाईचे ग्रामीण भागातील महिलांकडून स्वागत होत असून अशा महिलाभगिनी देखील ग्रामीण पोलीसांना कारवाईकामी सहकार्य करत आहेत.

जिल्ह्यात सुरू असलेल्या हातभट्टी व्यवसायांच्या निर्मूलनासाठी नाशिक ग्रामीण पोलिसांची सदर महिला पथके यापुढेही कार्यरत राहणार असून जिल्ह्यातील पोलीस पाटलांना त्यांना आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांना अवैध व्यवसायाविषयी काही माहिती असल्यास त्यांनी ती नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसायास प्रतिबंध घालण्याकामी सुरू केलेल्या हेल्पलाईन क्रमांक **६२६२ २५६३६३** यावर देऊन सदर महिला अंमलदारांच्या कामगिरीस हातभार लावावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.